रहिवासाचा पुरावा म्हणून शिधापत्रिकांचा वापर न करणे.

महाराष्ट्र शासन,
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : शिवाप-२००९/प्र.क्र.१००/ना.पु.२८,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ५ जून, २०१०.

पहा : १) शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-१८९७/१९६४/प्र.क्र.८०६५/ना.पु.२८, दिनांक २१.११.१९९८.
२) शासन पत्र क्र. बातमी-३६०६/४७४०/प्र.क्र.२५०२/नापु-२८, दिनांक ६.१०.२००६.

## परिपत्रक

सर्व तेल कंपन्यांकडून परवाना मिळणेबाबत, महानगर टेलीफोन निगमकडून दूरध्वनी मिळणेबाबत, उच्च व तंत्रशिक्षण व शालेय शिक्षण विभागाकडून प्रवेश मिळणेबाबत, परिवहन आयुक्त कार्यालयाकडून वाहन चालविण्याचा व वाहतूक करण्याचा परवाना मिळणेबाबत, पोलीस आयुक्त / सहपोलीस आयुक्त कार्यालयाकडून न्यायालयीन प्रकरणाबाबत / जामीन देणेबाबत, म्हाडाकडून झोपडपट्टी पुनर्विकास प्राधिकरण योजनेकरिता, अतिरिक्त जिल्हाधिकारी (अतिक्रमणे) यांच्याकडून वास्तव्याचा पुरावा म्हणून, पासपोर्ट ऑफीसकडून पारपत्र मिळणेबाबत, सिडकोकडून वास्तव्याचा पुरावा, सर्व महानगरपालिका कार्यालयांकडून परवाना देणे, जिल्हाधिकारी / तहसिल कार्यालयांकडून रहिवास, उत्पन्न, जात इ. प्रमाणपत्राबाबत, मतदार नोंदणी अधिकारी यांच्याकडून मतदार यादीत नाव समाविष्ट करणे/मतदानाकरिता / निवडणूक ओळखपत्र मिळविणे, शासनाच्या विविध योजनांसाठी रहिवासाचा पुरावा, बँकेकडून कर्ज घेण्यासाठी रहिवाशी पुरावा, तसेच, पॅनकार्ड मिळविण्यासाठी अशा विविध कामांसाठी, संबंधित प्राधिकाऱ्यांकडून किंवा कार्यालयाकडून अर्जदारांच्या शिधापत्रिकेची मागणी करण्यात येते. म्हणजेच एक प्रकारे अशा प्राधिकाऱ्यांकडून किंवा कार्यालयाकडून, शिधापत्रिकेचा ओळखपत्र म्हणुन किंवा निवासाचा पुरावा म्हणुन विचार केला जातांना दिसतो. वास्तविक शिधापत्रिका ही या विभागाकडुन संबंधित कुटुंबाला किंवा व्यक्तिला, शिधावाटप किंवा रास्त भाव दुकानातुन केवळ शिधावस्तु उचलण्यासाठी दिलेली आहे. ही शिधापत्रिका जीवनावश्यक वस्तु कायदा अंतर्गत सार्वजनिक आदेशातील तरतुदीनुसार दिलेली असते. त्या तरतुदीनुसार शिधा पत्रिकेचा वापर हा फक्त शिधावाटप दुकानातुन शिधावस्तु उचलण्यासाठीच करावयाचा असतो. अन्य कोणत्याही पुराव्यासाठी शिधापत्रिकेचा वापर करावयाचा नसतो. तशी स्पष्ट सूचनाही प्रत्येक शिधापत्रिकेवर (रेशन कार्ड) छापण्यात आलेली आहे. तरीही अन्य प्राधिकाऱ्यांकडुन किंवा कार्यालयाकडुन निवासाचा पुरावा म्हणुन शिधापत्रिका विचारात घेतली जाते, असे निदर्शनास आले आहे.

२. पुरवठा विभागाकडुन शिधापत्रिका देतांना, केवळ अर्जदार दिलेल्या पत्त्यावर राहतो काय, एवढीच जुजबी चौकशी केली जाते. अर्जदार कुटुंबाचे राहण्याचे ठिकाण कायदेशीर आहे की, बेकायदेशीर आहे, तो पक्क्या घरात राहतो की झोपडपट्टीत राहतो, या बाबी पाहिल्या जात नाहीत. अन्न ही एक प्राथमिक गरज आहे व ती पूर्ण होण्याकामी, रास्त भावाने शिधावस्तु देण्याच्या मानवतेच्या दृष्टीकोनातुन, एखादया विशिष्ट स्थानिक क्षेत्रात राहणाऱ्या व्यक्तिचा किंवा कुटुंबाला, पुरवठा विभागाकडुन पाच वर्षांसाठी किंवा तीन महिने, सहा महिने अशा तात्पुरत्या स्वरुपाची, शिधापत्रिका दिली जाते. एकदा शिधापत्रिका दिल्यानंतर, संबंधित कुटुंबातील सर्व व्यक्ति शिधापत्रिकेत नमुद केलेल्या पत्त्यावर राहतात की नाही, हे तपासण्याची कोणतीही यंत्रणा या विभागाकडे नाही. तशी तपासणी केलीही जात नाही, करणेही शक्य ही नाही. अनेकदा संबंधित व्यक्ती किंवा कुटुंब, दिलेल्या पत्त्यावर प्रत्यक्ष राहत नसले तरी शिधापत्रिकेचा नियमित वापर होणे शक्य आहे. कारण शेजाऱ्यांकडुन किंवा नोकरांकडुन/ मोलकरणींकडुन, शिधापत्रिकेवर रास्त भाव दुकानातुन शिधावस्तु आणल्या जावु शकतात. शिधावस्तु नेण्यासाठी स्वत: कुटुंब प्रमुखानेच आले पाहिजे, असे बंधन नाही. असे बंधन शिधापत्रिकाधारकांना गैरसोयीचे होईल. अशा स्थितीत दिलेल्या

[illegible]-१२३३(१०००-[illegible])-८

[कृ.मा.प.

पत्त्याचा प्रत्यक्षात न राहताही, इतरांकडून शिधापत्रिकेचा नियमित वापर होणे शक्य आहे. म्हणजेच शिधापत्रिका असणे किंवा तिचा वापर होणे हा संबंधित व्यक्तीच्या / कुटुंबाच्या निवासाचा पुरावा होवु शकत नाही.

३. वरील वस्तुस्थिती विचारात घेऊन, या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, पु.वठा विभागामार्फत दिल्या जाणा-या पुरवठा पत्रिका / शिधापत्रिका या त्या व्यक्तींच्या किंवा कुटुंबाच्या रहिवासाचा निर्णायक पुरावा म्हणून ग्राह्य धरू नये. निवासाचा पुरावा म्हणून शिधापत्रिकेचा विचार करण्याचे प्राधिकाऱ्यांनी / कार्यालयांनी टाळल्यास गरज नसतांनाही शिधापत्रिका मिळविण्याच्या प्रवृत्तीस किंवा बनावट शिधापत्रिका मिळविण्याच्या प्रवृत्तीस परिणामकारक आळा बसेल. कोणत्याही विभागास रहिवासाच्या पुराव्यासाठी शिधापत्रिकेचा वापर करावयाचा झाल्यास, त्यापूर्वी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांची परवानगी घेणे अनिवार्य राहिल.

४. सर्व मंत्रालयीन विभागांनी वरील सुचना त्यांच्या नियंत्रणाखालील सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणाव्यात.

सदरहू शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाची वेबसाईट www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर टाकण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१००६१७१७५०१८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( जे. पी. डांगे )
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
३. सर्व मा. मंत्री / राज्यमंत्री,
४. सर्व मंत्रालयीन विभाग,
५. सर्व जिल्हाधिकारी,
६. सर्व अतिरिक्त जिल्हाधिकारी,
७. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई.
८. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी / अन्नधान्य वितरण अधिकारी,
९. राज्य तेल समन्वयक, महाराष्ट्र.
१०. सर्व तेल कंपन्या,
११ भारतीय रिझर्व्ह बँक, मुंबई / नागपूर
१२. महानगर टेलिफोन निगम लि,
१३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. परिवहन आयुक्त, मुंबई.
१६. पोलिस आयुक्त, मुंबई.
१७. सह. पोलिस आयुक्त, मुंबई.
१८. सचिव, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई.
१९. उपाध्यक्ष, म्हाडा, वांद्रे, मुंबई.
२०. अतिरिक्त जिल्हाधिकारी, (अतिक्रमणे), जुने जकात घर, मुंबई.
२१. पासपोर्ट ऑफीस, वरळी, मुंबई.
२२. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, कोकण भवन, मुंबई
२३. सर्व महापालिका आयुक्त,
२४. सर्व कार्यासने, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
२५. निवड नस्ती (कार्या-ना.पु. २८)

नियंत्रक, शिधावाटप व संचालक, रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला, १४, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई-२०
१. नोंदणी क्रमांक ... /
२. नोंदणी झाल्याचा दिनांक ...
३. ...
४. ...
५. ...
६. ...
७. ...
८. ...
९. ...
१०. प्रकरण क्रमांक
११. धारिकेचे वर्गीकरण

... Documents and Settings\... Desktop\Copy of Loka...